## प्रेस नोट

### हडपसर पोलीसांकडून ध्वनि प्रदुषण नियमाचे उल्लघन करणा-या गणेश मंडळांवर व डी.जे मालकांवर कायदेशिर कारवाई.

दिनांक १९/०९/२०१८ रोजी सायंकाळी हडपसर पोलीस स्टेशन हद्दीतील मगरपट्टा परिसरात रांका ज्वलर्स च्या शेजारी अखिल भोरी भडक मित्र मंडळातर्फे कर्कश आवाजात डी.जे.चालू होता.सदर बाबत आजू बाजुच्या नागरीकांनी पो.स्टे.ला तक्रारी केल्यानंतर हडपसर पोलीस स्टेशनच्या पीएसआय गिरी व त्यांचे पथकाने लागलीच नॉईज लेवल मिटरने तपासणी केली असता १२० डेसिबल असल्याचे निदर्शनास आल्याने डी.जे.चे साहित्य जप्त करुन गणेश मंडळाचे अध्यक्ष चंदन कैलास तुपे व उपाध्यक्ष सुजित दिलीप माने तसेच डी.जे चे मालक साहील सय्यद मुन्नावर ,वानवडी गाव पुणे. यांचेवर ध्वनि प्रदुषण नियमन व नियंत्रण अधिनियम २००० चे नियम ५,पर्यावरण संरक्षण कायदा कलम १५,महाराष्ट्रा पोलीस अधिनियम कलम १०३,३३,३६,३७,६८,सह १३१,१३४,१३५,१४० चे अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

दुस-या घटनेत मांजरी येथे ०७ दिवसाच्या गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत राजहंस गणेश मित्र मंडळ यांनी यांनी त्यांच्या मिरवणूकीतील वाहनात फेरबदल करुन कर्कश आवाजात डी.जे.लावला होता.सायंकाळी मिरवणुक चालू असताना सपोनि काळे व स्टाफने पीएसआय गिरी व पथकाला सायंकाळी १०.०० वा.चे दरम्यान मोरे वस्ती येथे बोलावून घेतले असता तेथील आवाजाची डेसीबल पातळी १०० च्या वर असल्याचे निदर्शनास आले आहे.सदर मंडळाचे अध्यक्ष गिरीश कानकाटे व डी.जे चे मालक राजू तावडे कृष्णराज रा.बोरीऐंदी,ता.दौंड,जि.पुणे,यांच्यावर ध्वनि प्रदुषण नियमन व नियंत्रण अधिनियम २००० चे नियम ५,पर्यावरण संरक्षण कायदा कलम १५,महाराष्ट्रा पोलीस अधिनियम कलम १०३,३३,३६,३७,६८,सह १३१,१३४,१३५,१४० चे अंतर्गत कारवाई करण्यात आली असुन सदर दोन्ही कारवाईत डी.जे. साहीत्य जप्त करण्यात आले आहे.

दि.२१.९.१८

तिस-या घटनेत मगरपट्टासिटी,सिझन मॉल, येथे ०९ दिवसाच्या गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत स्टार सिझन गणेश मंडळ यांनी सकाळी १०/००वा .सुमारास मिरवणुक चालू असताना त्यांच्या मिरवणूकीत सार्वजनिक रोडवर कर्कश आवाजात डी.जे.लावला असल्या बाबत तेथे राहणा-या नागरीकांनी पोलीस स्टेशनला फोन करुन सांगितल्याने पीएसआय गिरी व पथक तात्काळ तथे पोहचुन तेथील आवाजाची डेसीबल पातळी मोजली असता डेसीबल पातळी १०० च्या वर असल्याचे निदर्शनास आले आहे.सदर मंडळाचे अध्यक्ष अनिकेत दिलीप मोरे रा.देवाची उरुळी,उपाध्यक्ष विक्रम गाटे रा.महादेवनगर व डी.जे चे मालक दिगंबर नारायण उंदरे मांजरी खुर्द,तसेच चालक अतुल संभाजी आटोळे मांजराईनगर यांच्यावर ध्वनि प्रदुषण नियमन व नियंत्रण अधिनियम २००० चे नियम ५,पर्यावरण संरक्षण कायदा कलम १५,महाराष्ट्रा पोलीस अधिनियम कलम

१०३,३३,३६,३७,६८,सह १३१,१३४,१३५,१४० चे अंतर्गत कारवाई करण्यात आली असुन सदर दोन्ही कारवाईत डी.जे. साहीत्य जप्त करण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.सुनिल फुलारी अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, मा.प्रकाश गायकवाड पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५ पुणे मा.सुनिल देशमुख सहा. पोलीस आयुक्त हडपसर विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली मा.सुनिल तांबे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन व पीएसआय गिरी यांच्या पथकाने केली आहे. सदर कारवाई मुळे गणेश मंडळांच्या पदाधिकारी यांना भविष्यात मोटार लायसन्स व पासपोर्ट मिळण्यासाठी अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

हडपसर परिसरात गणेशोत्सव दरम्यान ९ व्या, १० व्या व शेवटच्या दिवशी अशीच जोरदार कारवाई करण्यात येणार असल्याचे सुनिल तांबे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन यांनी सांगितले.

ता. २१/०९/२०१८

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,<br>
हडपसर पोलीस स्टेशन, पुणे